## महाराष्ट्र राज्य बालशिक्षण परिषद, धुळे केंद्र

## स्वतः अनुभव घेत साकारलेली "अनुभवनगरी"!

महाराष्ट्र राज्य बालशिक्षण परिषद, धुळे केंद्रातर्फे दिनांक १ फेब्रुवारी २०२०, शनिवार रोजी कमलाबाई शंकरलाल कन्या शाळा, धुळे येथे "अनुभवनगरी" साकारण्यात आली. ह्यात भाजी मंडई, खाऊगल्ली आणि विज्ञानजत्रा अशा तीन गोष्टींचा समावेश होता.

**भाजी मंडई -** इयत्ता ३री आणि ४ थी च्या विद्यार्थीनींनी विविध प्रकारच्या पालेभाज्या, फळभाज्या आणून त्यांची विक्री केली. ह्यातून त्यांना गणिताच्या बेरीज, वजाबाकी, वाटा, नग, किलो, ग्रॅम ह्या संकल्पना व्यवहारातून प्रत्यक्षात शिकायला मिळाल्या. शिवाय भाजीबाजार संकल्पना राबवताना शेतकऱ्यांचे कष्ट, विकताना घ्यावी लागणारी मेहेनत हे सुद्धा अनुभवातून समजले. "भाजी घ्या भाजी, ताजी ताजी भाजी" हे प्रत्येक जण वेगवेगळया शैलीत म्हणत होते हे बघून विशेष वाटले. सर्व शिक्षक, संस्थाचालक, पदाधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी तसेच पालकांनी भाजी विकत घेऊन मुलींच्या ह्या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद दिला.

**खाऊगल्ली -** इयत्ता ३ री आणि ४ थी च्या विद्यार्थीनींनी गॅस न वापरता तयार होणाऱ्या पदार्थांचे स्टॉल लावले होते. ह्यात पोंगे बटाटे, शेव पुरी, भेळ, काकडी, पेरू, बोरं, सँडविच, फुटाणे, खारेदाणे इ. खाद्यपदार्थ होते. तर काहींनी पालकांच्या मदतीने इडली चटणी, मसाला पापड, ढोकळा, तीळगुळ असे देखील स्टॉल ठेवले होते. ह्याचा विद्यार्थीनींनी, पालकांनी, शिक्षकांनी आणि सर्व पदाधिकारी, सदस्य ह्यांनी मनसोक्त आस्वाद घेतला.

**विज्ञान जत्रा -** इयत्ता ५ वी आणि ६ वी च्या विद्यार्थीनींनी अभ्यासक्रमातील विज्ञान आणि परिसर अभ्यास ह्या पुस्तकातील संकल्पना स्पष्ट होण्याकरिता विविध प्रात्यक्षिके, तक्ते तसेच उपकरणे तयार केली होती. त्यांचे देखील प्रदर्शन ह्या अनुभवनगरीच्या निमित्ताने भरवण्यात आले. विज्ञानाच्या पुस्तकातील सिद्धांतांचा आधारे तयार केलेल्या ह्या प्रकल्पांची, तक्त्यांची संपूर्ण माहिती मुलींनी सगळयांना दिली. त्यांच्यापेक्षा लहान मुलींना देखील हे प्रकल्प दाखवण्यात आले आणि त्या चिमुकल्यांनी सुद्धा विविध प्रश्न कुतूहलाने विचारले.

अशाप्रकारे स्वतः घेतलेल्या अनुभवातून शिकत ह्या अनुभवनगरीच्या निमित्ताने विद्यार्थीनींनी ह्या अनुभवांचे, शिक्षणाचे आदान प्रदान केले हे मात्र नक्की!

ह्या कार्यक्रम प्रसंगी महाराष्ट्र राज्य बालशिक्षण परिषद अध्यक्षा आणि स्त्री शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा अलकाताई बियाणी, बालशिक्षण परिषद धुळे केंद्राच्या अध्यक्षा सौ मनीषा ठाकरे, उपाध्यक्ष डॉ. अरुण साळुंखे, सचिव केतकी म्हस्कर, सहसचिव अरुणा नाईक, खजिनदार प्रसाद कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य केदार नाईक, सुजय भालेराव, रवींद्र टाकणे, साधना मानेकर, उषा जोग उपस्थित होते. तसेच स्त्री शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा सुहासिनीताई देशपांडे, उपाध्यक्ष नंदलाल रुणवाल, सचिव सौ शिल्पा म्हस्कर तसेच सदस्य सुनील खिवसरा, अनघा ओक, सौ सरोज देशपांडे आणि तीनही विभागांच्या मुख्याध्यापिका तसेच पर्यवेक्षिका अशा सर्वांनी उपस्थित राहून मुलींचा उत्साह वाढविला.